# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 01/07/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

### फसवणुक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा भिवापुर येथे दिनांक 06/06/2020 चे 14:49 वा. ते दिनांक 15/06/2020 चे 13:51 वा. दरम्यान फिर्यादी हिने लग्नाकरीता जिवनसाथी डॉट कॉम वर 1 महीन्यापूर्वी रजिस्ट्रेशन केले होते. त्यादरम्यान जिवनासाथी डॉट कॉम या साईटवरुन आ.क्र. 1) अतुल शर्मा, रा. लंडन, मुळ गाव पंजाब सोनिपथ याच्या सोबत ओळखी झाली. फिर्यादी हीने स्वतःचा माबाईल क्रमांकावरुन लग्नासाठी रिक्वेस्ट पाठविली. तेव्हा पासुन आरोपीने सांगीतले की, लंडंन येथुन 25 लाखाचे ज्वेलरी व रक्कम पाठवीत आहे. त्यानंतर फिर्यादीने आरोपी क्र. 2) सोनिया शर्माचा मोबाईल वर चॅटीग करून हिने 'दिल्ली एअरपोर्ट वर आपले पार्सल आले आहे, त्याकरिता तुम्हाला टॅक्स भरावी लागेल' अशा माहितीवरुन फिर्यादीने आरोपीतांच्या मागणीप्रमाणे 1,07,000/–रु. वेगवेगळे खात्यात जमा केले. आरोपीतांनी संगमत करुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/भस्मे 9764946808 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर खापा येथे दिनांक 30/06/2020 चे 10.30 वाजता दरम्यान युवराज मसराम करनाळे, वय 35 वर्ष, रा. सुरडोह म.प्र, ह.मु. खापा हे शेतावर मजुरीचे काम करीत असता, एका शेतातुन दुस–या शेतात जात असता इलेक्ट्रीक लाईन चा जिवंत तार तुटुन त्याचे अंगावर पडल्याने इलेक्ट्रीक करंट लागुन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मंगेश शंकर हिंगे, वय 32 वर्ष, रा. खापा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना वानखेडे 9578749623 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर